दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ६२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२ जून २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त न्हावा खाडी येथे ज्येष्ठ नागरिक सत्कार

## अभिष्टचिंतन सोहळा, 'मी मराठी' संस्कृती दर्शन, रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचा आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दिनांक ०२ जून रोजी उत्तर रायगड जिल्हा भाजप व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने न्हावा खाडी येथे ज्येष्ठ नागरिक सत्कार समारंभ, अभिष्टचिंतन सोहळा, रुग्णवाहिका लोकार्पण, संस्कृतीचे दर्शन असलेला 'मी मराठी' कार्यक्रम होणार असून या समारंभाची जय्यत तयारी आज (बुधवारी) अंतिम टप्प्यात आली आहे.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक, माजी मंत्री व विद्यमान आमदार रवीशेठ पाटील, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देणारे दानशूर व्यक्तिमत्व म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सुपरिचय आहे. सामाजिक बांधिलकी जपणारे नेतृत्व म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. गरीब गरजूंना मदतीचा हात देऊन त्यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे. गेल्या चार



दशकात त्यांनी राजकारणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात कायमच भरीव योगदान दिले आहे. आणि त्यांच्यावर सर्व क्षेत्रातील लोकांचे प्रेम आहे व तो नेहमीच वृद्धिंगत झाला आहे. त्या अनुषंगाने ०२ जून रोजी न्हावा खाडी येथील म्हसेश्वर मंदिराशेजारील क्रिकेट मैदानावर सायंकाळी ०६ वाजता ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे.

तत्पूर्वी सायंकाळी ५. ३० वाजता आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उलवा नोड करिता देण्यात येणा-या रुग्णवाहिका व शववाहिकेचे लोकार्पण होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ०७ वाजता महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत व नंदेश उमप निर्मित लोककलांतून महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या 'मी मराठी' या सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी येणाऱ्या शुभेच्छुक हितचिंतकांनी पनवेल येथील निवासस्थानी किंवा कार्यालयात न येता ०२ जून रोजी न्हावा खाडी येथे होणाऱ्या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# पनवेल महानगरपालिकेच्या 'स्वराज्य' या प्रशासकीय इमारतीचे ३ जूनला भूमीपूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या 'स्वराज्य' या प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन, विविध योजनांचे भूमीपूजन त्याबरोबरच इतर विकास कामांचा लोकार्पण सोहळा ३ जूनला सायंकाळी ५.३० वाजता आद्य क्रांतीवीर बळवंत फडके नाट्यगृहामध्ये होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल राहणार असून नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस ,पालकमंत्री अदिती तटकरे, ,खासदार सुनिल तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अनिकेत तटकरे, आमदार बाळाराम पाटील, आमदार निरंजन डावखरे, आमदार जयंत पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, आमदार रविशेठ पाटील, आमदार भरत गोगावले, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, उपमहापौर सिताताई पाटील, विराधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, सभागृह नेते परेश ठाकूर आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

१) प्रभाग क्रमांक १४ मधील भूखंड क्र.०४, से.१६, नवीन पनवेल (प.) येथे पनवेल महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत- 'स्वराज्य' बांधकाम करणे. २) प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत महाकाली नगर, वाल्मिकी नगर, टपाल नाका, लक्ष्मी वसाहत येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करून घरे बांधणे. ३) प्रधानमंत्री आ- वास योजना अंतर्गत पटेल मोहल्ला व कच्छी मोहल्ला येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करून घरे बांधणे. ४) प्रभाग क्र. १६ मधील भूखंड क्र. २८, से. ११, नवीन पनवेल (पूर्व) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र (अॅकेडमी) विकसित करणे. ५) प्रभाग क्र. ४ मधील भूखंड क्र. १५१, से. २१ खारघर येथे महापौर निवासस्थान - 'शिवनेरी' बांधकाम करणे. ६) प्रभाग क्र. ७ मधील भूखंड क्र. ५, ६, ७ व ८, से. ८ई कळंबोली येथे प्रभाग कार्यालय -'विजयदुर्ग' बांधकाम करणे. ७) भूखंड क्र. १३, काळुंद्रे येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे. ८) प्रभाग क्र. १३ मधील जुई गावामध्ये मल:निस्सारण वाहिन्या टाकणे, पंम्पिंग स्टेशन बांधणे व मल: प्रक्रिया केंद्र उभारणे. लोकार्पण समारंभ : १) पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. १२५ मधील सुशोभिकरण केलेले वडाळे तलाव. २) पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. १२७ अ मधील प्राथमिक मराठी कन्या शाळेची इमारत. ३)प्रभाग क्र. १३ मधील सुशोभिकरण केलेले जुई गावामधील तलाव. ४) अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेतून पनवेल येथील मार्केट यार्ड, तक्का रोड, इच्छापूर्ती गणेश मंदिर, हरि ओम नगर, एच.ओ.सी. कॉलनी जवळील उभारलेले उंच जलकुंभ.

## रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचे आधारवड व दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय युवा मोर्चा पनवेल शहर व ग्रामीण तर्फे गुरुवार दिनांक ०२ जून रोजी पनवेलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात सकाळी ८. ३० ते दुपारी ०२ वाजेपर्यंत हे शिबीर होणार असून या शिबिरात रक्तदात्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष रोहित जगताप, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे यांनी केले आहे.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून

# गुरुवारी महापालिका क्षेत्रातील ग्रामीण भागात विकासकामांचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवार दिनांक ०२ जून रोजी महापालिका क्षेत्रातील पेंधर, ओवे, धरणा कॅम्प, पिसार्वे, तुर्भे, घोटचाळ, घोट, नागझरी, देवीचापाडा, पालेखुर्द या ग्रामीण भागात एकूण ४ कोटी ७३ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन होणार आहे.

या भूमिपूजन सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीता पाटील, सभागृहनेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, यांच्यासह प्रभाग समिती सभापती, नगरसेवक, नगरसेविका तसेच पदाधिकारी उपस्थित रा- हणार आहेत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'अ' मधील पेंधर गावातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व गटार बनविणे, प्रभाग क्रमांक ३ मधील ओवे गावात नवीन जलवाहिन्या टाकणे, प्रभाग क्रमांक १ मधील धरणा कॅम्प गावातील अंतर्गत गटारे बांधणे, पिसार्वे गावातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व गटार बनविणे, तुर्भे गावातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व गटार बनविणे, घोटचाळ गावातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, घोट गावातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे व आरसीसी गटार बांधणे, नागझरी गावातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, प्रभाग क्रमांक २ मधील देवीचापाडा येथे गटार बांधणे, रस्ता डांबरीकरण आणि समाज मंदिराचे बांधकाम करणे, तसेच पालेखुर्द गावातील गणेश मंदिर ते स्मशानभूमी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण आणि आरसीसी गटार बांधण्याचे काम करण्यात येणार आहे.

# तीन हजाराची लाच घेताना पीएफ विभागाचे तीन अधिकारी अँटिकरप्शनच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भविष्य निर्वाह निधी मधून ना परतावा निधी मंजूर करणेकरिता तीन हजार रुपयांची लाच मागणाऱ्या या तिघांवर लाच लुचपत विभागाची कारवाई रायगड विभागाने कारवाई करीत अटक केली आहे.तक्रारदार यांच्या भविष्य निर्वाह निधी मधून ना परतावा निधी मंजूर करणेकरिता आरोपी लोकसेवक यांनी तीन हजार रुपयांची लाच मागितली होती.सदर तक्रारदार हे त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी अलिबाग पंचायत समिती यांच्या इमारतीमध्ये असणाऱ्या वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांच्या कार्यालयात तीन हजार रुपयांची लाच घेताना प्रशांत पांडुरंग तावडे, राजेंद्र रामचन्द्र गायकवाड, रुपेश सुभाष देशमुख अटक करण्यात आली आहे.

रायगड जिल्हयातील शिक्षण उप संचालक,मुंबई विभाग यांच्या अलिबाग येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांच्या कार्यालयातील प्रशांत पांडुरंग तावडे, (वय-४५ वर्षे, सहा.लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाहनिधी पथक (माध्यमिक) अलिबाग् रायगड), राजेंद्र रामचन्द्र गायकवाड, वय ५७ वर्षे, मुख्य लिपिक, वेतन व भविष्य निर्वाहनिधी पथक (माध्यमिक) अलिबाग रायगड, रुपेश सुभाष देशमुख, वय ३२ वर्षे, कनिष्ठ लिपिक, वेतन व भविष्य निर्वाहनिधी पथक (माध्यमिक) या तिघांनी तक्रारदार यांच्याकडे भविष्य निर्वाह निधी मधून ना परतावा निधी मंजूर करणेकरिता तीन हजार



रुपयांची लाच मागणाऱ्या या तिघांवर लाच लुचपत विभागाची कारवाई रायगड विभागाने कारवाई करीत अटक केली आहे. तक्रारदार यांच्या भविष्य निर्वाह निधी मधून ना परतावा निधी मंजूर करणेकरिता आरोपी लोकसेवक यांनी तीन हजार रुपयांची लाच मागितली होती.सदर तक्रारदार हे त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी अलिबाग पंचायत समिती यांच्या इमारतीमध्ये असणाऱ्या वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांच्या कार्यालयात तीन हजार रुपयांची लाच घेताना प्रशांत पांडुरंग तावडे, राजेंद्र रामचन्द्र गायकवाड, रुपेश सुभाष देशमुखअटक करण्यात आली आहे. सदर कारवाई ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक पंजाबराव उगले, अप्पर पोलीस अधीक्षक अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड लाचलुचपत विभागाच्या उपअधीक्षक सुषमा सोनावणे, पोलिस हवालदार अरुण करकरे, पोलीस हवालदार विनोद् जाधव, पोलीस हवालदार महेश पाटील पोलीस नाईक, सचिन आटपटकर पोलीस नाईक जितू पाटील यांच्या पथकाने कारवाई केली आहे.



# माणुसकीचे नाते लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब!

**माणुसकी म्हणजे प्रेम, माणुसकी म्हणजे जाणीव, माणुसकी म्हणजे माणसाने माणसाची केलेली कदर, समोरच्या व्यक्तीचा केलेला आदर, माणूसकी म्हणजे निस्वार्थपणे माणसातील माणुस ओळखून पुढे केलेला मदतीचा हात आणि हेच माणुसकीचे नाते म्हणजेच लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब!**

नावाप्रमाणेच नितीज्ञ, धर्मज्ञ, ध्येयसक्त, ज्ञानी, पराक्रमी असे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व म्हणजे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर. त्यांचा चरित्रग्रंथ लहानथोरांना प्रेरणादायी असाच आहे. गरिबीची जाण असणारे गोरगरिबांचे उद्धारकर्ते, समस्यांचे मूळ माहित असल्याने आपल्या व्यापक दूरदृष्टीतून समस्या निवारण करणारे व्यासंगी लोकनेते रामशेठ ठाकूर अनेकांच्या गळ्यातील ताईत आहेत. दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांच्यानंतर लोकनेते हि पदवी जनतेने माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनाच दिलेली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सत्तेची दारे नेहमीच उघडी राहिली याला कारण त्यांचे समाजकारण. अतिशय निस्पृह भावनेने ते दानधर्म करताना मी पाहिले आहे. त्यांचा सहवास नागरिकांना अगदी सहज लाभतो हेही विशेष. प्रत्येक कामात उत्कृष्टता यायला हवी हा त्यांचा आग्रह असतो म्हणूनच राजकारणापलीकडे जावून शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी पाय ठेवला तेथे उल्लेखनीय कामगिरी करून दाखविली आहे. शिस्तप्रिय आणि उत्तम व्यवस्थापक असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना नियोजनबद्ध कार्यक्रम खूप आवडतात.

निवडणूक कोणतीही असो, लोकसभा, विधानसभेची असो महापालिकेची कोणतीही निवडणूक न लढवण्याची घोषणा करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हेच 'किंग'मेकर ठरतात. विषय जिथे गंभीर तिथे लोकनेते रामशेठ ठाकूर खंबीर असल्याने कोणतेही प्रश्न सोडविले जातात, त्यामुळे निकटवर्तीय त्यांना 'सुप्रीम कोर्ट 'असेही संबोधतात. शिक्षणातूनच क्रांती घडते असा ठाम विश्वास त्यांना असल्यामुळे या क्षेत्रात त्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून खूप मोलाचे कार्य उभे केले आहे. हि त्यांची स्वतःची संस्था असली तरी रयत शिक्षण संस्थेवर त्यांचे जीवापाड प्रेम आहे. रयत शिक्षण संस्थेला जेव्हा-जेव्हा गरज पडली तेव्हा लोकनेते रामशेठ ठाकूर मदतीला धावून आले. रयतेच्या विकासात त्यांचा मोलाचा वाटा आहे हे सर्वश्रुत आहे. चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात, शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वांनी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून देणे गरजेचे आहे, या सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबिय कार्य करीत आ-हेत. रयत आणि ठाकूर कुटुंबिय यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, यासाठी कर्मवीर अण्णांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम रयत सेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत करीत आहेत. रयत शिक्षण संस्था मोठी होण्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे योगदान हे समाजासाठी एक आदर्श असून त्या अनुषंगाने सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' साकारले आहे, आणि खऱ्या अर्थाने हा समाजातील सर्व घटकांचा सन्मान असून भावी पिढीसाठी हि आदर्श वास्तू प्रेरणादायी ठरणार आहे.

सामाजिक, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्याच नावाने सुरु असलेल्या संस्थांची कामगिरी अतुलनीय अशी असल्यामुळे रायगड जिल्ह्याचा विषय असेल तेंव्हा लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्याशी तो जोडला जातोच. सामान्य नागरिक ते लोकनेता हा त्यांचा प्रवास प्रेरणादायी असा आहे. इतिहासात रमणारे,केवळ वडिलांचीच कीर्ती सांगणारे खूप असतात मात्र शून्यातून विश्व उभे करून सर्वांना सोबत घेऊन पुढे लोकनेते रामशेठ ठाकूर समाजाच्या उत्कर्षासाठी आदर्श उदाहरण आहेत. राजकारणात आलेले सर्व नेते हे सर्वस्वी राजकारणावर अवलंबून असतात पण समाजकारणाचे भान ठेवून काम करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा राजकारण हा मूळ पिंड नसून समाजकारण हाच त्यांचा गाभा आहे. कोणतेही सत्ता पद नसताना लोकसभेवर निवडून जाणे हे भल्याभल्यांना तोंडावर आपटण्यासारखे आहे. फक्त आपल्या कतृत्वाच्याआणि दातृत्वाच्या बळावर लोकनेते रामशेठ ठाकूर हे दोनदा खासदार झाले. आपली ख्याती सर्वदूर पसरली आहे हे माहिती असून त्यांनी कधी मी पणा बाळगला नाही. राजकारणात सत्तापद मिळवण्याच्या आधीपासून त्यांनी समाजसेवेचे व्रत घेतले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा भारतीय संसदेत खासदार म्हणून काम करताना देखील त्यांनी निरपेक्ष व निस्पृह सेवेच्या भावनेने व कोणताही गर्व मनात न बाळगता समाजाला अभिप्रेत काम केले आहे. आजही खासदारकीच्या वेळी झालेल्या विकासकामांची चर्चा रायगड जिल्ह्यातील गावागावात ज्येष्ठांकडून ऐकायला मिळते आणि त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा गौरव आवर्जून मिळतो, त्यामुळे अनेकांचा हट्टाहास होता कि त्यांनी पुन्हा खासदार झाले पाहिजे, पण त्यांनी यापूर्वीच निवृत्ती जाहीर केल्याने त्याबाबतीत विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. राजकिय क्षेत्रात नेत्यांची कमरता भासत नाही. परंतु त्यांच्या पाठीमागे किती जनाधार असतो हा संशोधनाचा भाग आहे. जनतेचे पाठबळ असलेले नेते राजकारणात फारच दुर्मीळ असतात. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर जन-ाधार असलेले लोकनेते आहेत. कमालीची लोकप्रियता त्यांना आहे. समाजकारणी म्हणून त्यांची ठळक प्रतिमा समाजात आहे. दानशुर व्यक्तीमत्व म्हणून त्यांना देशभर ओळखले जाते. त्यांना राजकारणापेक्षा समाजकारणात विशेष रूची आहे. सामाजिक बांधिलकी हे तत्व त्यांनी सुरूवातीपासून अंगीकारले आहे. दररोज शेकडो लोक त्यांना भेटण्याकरीता येतात. त्यामध्ये अडचणींची सोडवणुक करण्याबरोबरच मदतीच्या अपेक्षेने अनेक जण येतात. साहेबांकडे आलेली व्यक्ती रिकाम्या हाताने परत कधीच जात नाही. अनेकांचे अश्रु पुसण्याचे काम साहेब करतात. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचे बाळकडू त्यांना लहान वयातच आई-बाबांकडून मिळाले होते. त्यामुळे जीवनातील संघर्षाला तोंड देत असताना आपल्या आंतरमनात शिक्षणाविषयीची आस त्यांनी जागृत ठेवली. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील विद्यालयात त्यांनी 'कमवा आणि शिका' या तत्त्वाने आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी शिक्षणाची जाण ठेवत रयत संस्थेच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने मदतीचा हात देऊ केला आहे. आज त्यांच्या कार्याचा गौरव सर्वत्र होत असून रयत शिक्षण संस्थेनेही त्यांचे नाव अनेक विद्यालयांना देऊन त्यांच्या कार्याची पावतीच दिली आहे. कष्टकरी, गोरगरीब घरातील मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून उभे केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा, सी.के.टी.महाविद्यालय यामुळे कष्टकरी माणसांच्या झोपडीपर्यंत इंग्रजी भाषेचे ज्ञान आणि आधुनिक शिक्षण पोहोचले आहे. समाजातील सर्वसामान्य माणसांच्या न्याय हक्कासाठी सतत पुढे राहणे, प्रसंगी स्वजनांशी संघर्ष करणे हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा स्थायीभावच. केवळ समाजासाठी जगणारे लोकमान्य लोकनेता म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली आहे. सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, सकारात्मक विचारसरणी, कठोर परिश्रमघेण्याची तयारी, प्रामाणिकपणा, अचूक निर्णय क्षमता, कर्तव्यनिष्ठा, श्रद्धा या गुणांमुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजजीवनातील यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत.

**शब्दांकन**
**हरेश साठे (प्रसिद्धी प्रमुख)**



राजा म्हटले की रयतेला सांभाळून घेणारा, त्यांच्या अडीअडचणीला धावून येणारा, मदत करणारा, त्यांच्या सुख-दु:खात समाविष्ट होणारा असा असावा. पनवेल-उरण हे जर संस्थान असते तर खरंच या संस्थानचे राजे म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचेच नाव असते. रामशेठ ठाकूर ही एक व्यक्ती नसून संस्था आणि माणुसकीचे जाळे आहे, अनेकांसाठी हा परीस आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे गरीब कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व आहे. जे काही मिळवले आहे ते संघर्ष करून मिळवले आहे. संघर्ष करून पुढे आलेल्या व्यक्तीला थांबवणे अशक्य असते. कारण त्यांची पावले आत्मविश्वासाने पडत असतात. राजकारणात पडल्यानंतर काही जण समाजकारणकमी आणि राजकारणच अधिक करतात पण रामशेठ याला अपवाद ठरले. कोणताही, कोणत्याही पक्षाचा गरजवंत व्यक्ती त्यांच्या दरबारात मदतीसाठी पोहोचला आणि तो खाली हात परत येणे शक्य नाही. त्याची गरज ओळखून त्याला योग्य ती मदत रामशेठ यांच्या दरबारात केली जाते. काहीमाणसचं अशी असतात की, उन्हानं लाल होणं, पावसानं मस्त होणं अगर दिव्यानं उजळ होणं त्यांच्या बाबतीत संभवत नाही. तसेच रुबाबदार राहणीचा सोस त्यांना मुळीच नसतो. साधी राहणी व उच्च विचारसरणी ह्यालाच ते प्रमाण मानतात. शून्यातून विश्व निर्माण करण्याची प्रचंड ताकद त्यांच्यामध्ये आहे. श्रीमंत, धनवंत आणि अगदी कुबेर अशी माणसे खूप असतात. पण, ती माणसं लांबून खूप मोठी वाटतात. ती त्यांच्याजवळ गेल्यावर मनाने, विचाराने आणि वर्तनाने खूप छोटी असल्याचे अनुभवास येतात. लोकनेते रामशेठ ठाकूर हे व्यक्तिमत्त्व असे आहे की, त्यांचे वागणे, बोलणे, त्यांचे काम, जीवनातील सहजपणा, साधेपणा आणि निर्मळपणा त्यांच्यात ओतप्रोत भरलेला आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाने मोठ्या मनाचे 'राजा माणूस' आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची थक्क करून सोडणारी वाटचाल खडतर ते दैदिप्यमान कामगिरी अशी आहे. न्हावा गावात सामान्य कुटूंबात जन्मलेले रामशेठ ठाकूर यांनी शिक्षक, उद्योजक ते खासदार असा प्रवास करीत राजकारणात प्रवेश केला. समाजसेवेची नित्यांत आवड व आस्था असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन वेळा खासदार म्हणून रायगडचे प्रतिनिधीत्व केले. मुळत: समाजसेवेचा पींड असल्यामुळे त्यांनी तेथेही जिल्हयाच्या भविष्यासाठी विविध प्रकारच्या योजना व निधी आणत रायगडचा झंझावाती विकास साधला.

घरची गरिबी परंतू कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सात-ारा येथील कॉलेजमध्ये 'कमवा आणि शिका' या कर्मवीरांच्या संदेशाप्रमाणे शिकले आणि कमवून ते उद्योगपती झाले, त्यांनी दानधर्म केले, दुसेयांना मोठे केले त्याच बरोबर शिक्षण क्षेत्रात गरूड झेप घेवून जनार्दन भगत शिक्षण संस्था स्थापन करून मुंबई विद्यापीठाच्या रांगेत मानाचे स्थान मिळविले, त्याच बरोबर उलवा नोडमध्ये जागतिक किर्तीचे क्रीडा संकुल उभारून मानाचे स्थान मिळविले. अनेक सामाजिक उपक्रम राबवून लोकांची निस्वार्थी सेवा केली. मंदिरे, शाळा, क्रिडांगणे, समाज मंदिरांना आर्थिक मदत दिली. गोर गरिबांना मदतीचा हात दिला तो अजूनही चालू आहे. आकर्षक व्यक्तीमत्व, सर्वांना समान न्याय, सर्व धर्म समभावाची पताका खांद्यावर घेणारे लोकनेते रामशेठ ठाकूर विकासाचा गाडा, जगन्नाथाचा रथ पुढे सरकवित आहेत. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत जन्मलेला माणूस सर्व क्षेत्रात उच्च भरारी घेवू शकतो ही प्रेरणा देणारी बाब आहे. शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून आयुष्यभर लढणारे संघर्षमुर्ती लोकनेते दि. बा. पाटील साहेब यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देऊन प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांचा सन्मान करण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पुढाकार महत्वाचा ठरला आहे आणि त्या अनुषंगाने ९५ गावातील प्रकल्पग्रस्त एकसंघ करण्याचे श्रेय लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जात आहे. दिबासाहेबांच्या इच्छेप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याची आग्रही भूमिका लोकनेते रामशेठ ठाकूर यांची राहिली आहे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर जेव्हा जेव्हा अन्यायाची वेळ येते तेव्हा लोकनेते रामशेठ ठाकूर ऊन पाऊस आणि कसलीही तमा न करता धावून जातात आणि त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना मोठी ताकद मिळत असते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा माणसावर अधिक विश्वास आहे. एक गोष्ट खरी आहे की, हाडामासाच्या माणसावर, त्यांच्या कर्तृत्वावर त्यांची अधिक श्रध्दा आहे. माणसाच्या अंगात असलेल्या सामर्थ्याचा, कर्तत्व शक्तीचा, चांगुलपणाचा प्रत्यय ते चांगले जाणतात. माणसाने ठरविले तर आकाशाला भिडणार मोठेपण त्याच्या अंगी येवू शकेल असा त्यांचा आत्मविश्वास आहे, फक्त माणसाच्या ठायी असायला हवा तो दढ निश्चय. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनात कर्तत्व फुलविणारी माणसे भेटत गेली आणि त्या प्रत्येक व्यक्तीने त्यांना चांगले विचार दिले, दिले म्हणण्यापेक्षा ते त्यांनी घेतले. या सर्व व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात आदरभाव आहे. आता पर्यंतच्या आयुष्यात त्यांना जो लौकिक मिळाला त्याच श्रेय दयायच असेल तर ते कुणा एका व्यक्तीला न देता परिस्थितीला दयावे लागेल, परिस्थितीनेच त्यांना घडविले. विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीमुळे काही माणसे, काही व्यक्ती त्यांच्या सानिध्यात आल्या परिस्थिती शहाणं बनविते या वास्तव्याची जाण करून दिली. मार्गदर्शन केल, आयुष्य सदैव समध्द केले, अनुभवाची क्षितीजे विस्तत झाली म्हणूनच आयुष्यात जे काही चांगल घडलं त्याच श्रेय परिस्थितीला दिले पाहिजे.

मातोश्री भागूबाई, पिताश्री चांगू ठाकूर व सासरे जनार्दन भगत साहेबांचे आशिर्वाद त्यांना लाभले, प्रत्येक पुरुषाच्या यशात स्त्रीशक्ती असते ती शक्ती त्यांच्या पत्नी शकुंतला यांनी दिली तर पुढील कार्याला साथ लाभली ती आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर या सुपुत्रांची लाभली. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर अण्णांचा आदर्श घेऊन ते नेहमी कार्यरत राहिले असून त्यांचा माणसांवर अधिक विश्वास आहे. माणुसकी व कर्तव्याची जाण ठेवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या जवळ असलेली आर्थिक शक्ती लोककल्याणासाठी सार्थकी लावण्याचे ठरविले आणि त्यांनी तसे केल आणि आताही करीत आहेत. गरीब गरजूंना मदत, सामाजिक, सांस्कतिक, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रांना भरघोस मदतीचा हात, रूग्ण, खेळाडू, शिक्षण क्षेत्रात उच्च शिक्षणासाठी सहकार्य, आपत्ती, दुष्काळ, अनेक घटकांना मदत हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा दानशुरपणा अजूनही चालू आहे आणि तो सार्थकी लागत आहे म्हणूनच लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मनाला समाधान वाटत असून राजकीय व आर्थिक शक्ती लोक कल्याणासाठी सार्थकी लावणारा नेता म्हणून ते सुपरिचित आ-हेत. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासात ज्या थोर व महनीय व्यक्तींनी आपल्या कर्तुत्वाने नवी दिशा दिली. त्या व्यक्तीमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव फार महत्वाचे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रात स्वकर्तुत्वाने त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य असणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे रयत शिक्षण संस्थेच्या लहान मोठ्या शाखांचे व रयत सेवकांचे आदर्श आहेत. एकुणच महाराष्ट्राच्या समाजकारणाचा व राजकारणाचा विचार केला तर महाराष्ट्रामध्ये लोकनेते या पदाला पोहचलेल्या हाताच्या बोटावर मोजण्या एवढ्याच व्यक्ती आहेत त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आदराने नाव घेतले जाते. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कृतिशील विचारांचा समृद्ध वारसा पुढे चालवित आहेत. त्यांच्यातील दातृत्व या असामान्य गुणामुळे संपूर्ण महाराष्टाच्या जीवनात आदरयुक्त स्थान आहे. साधी राहणी आणि उच्च विचार हे त्यांनी अंगिकारलेले तत्व सर्वांना प्रेरणादायी ठरले आहे. त्यामुळे सर्व स्थरातील माणसाच्या मनात त्यांच्याप्रती नेहमीच आदराचे स्थान आहे, त्यामुळे सर्वसामान्यांचे आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना त्यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त निरोगी व दीर्घायुष्य लाभो, हि साईचरणी प्रार्थना!

# जबरी चोरीतील फिर्यादीच निघाला आरोपी ; खांदेश्वर पोलिसांनी केली गुन्ह्याची उकल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जबरी चोरी संदर्भात फिर्याद देणारा इसमच आरोपी निघाला असून या गुन्ह्याची उकल तांत्रिक तपासाद्वारे व सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे केल्याने खांदेश्वर पोलिसांचे कौतुक होत आहे.

तक्रारदार नामे उमेश दगडू कदम वय ४२ वर्ष, रा. गुजरात वापी हे त्यांच्या मालकीचा आयशर ट्रक क. GI-15-XX-1216 मध्ये माल घेवून पुणे मुंबई अशी वाहतुक करीत असताना एक्सप्रेस वे संपण्यापूर्वी १००० मीटर अंतरावर आल्यावेळी दोन इसमांनी ट्रक ला हात दाखवून, ते गाईड असल्याचे सांगून ट्रकमध्ये बसले व साकेत ब्रीज येथे आल्यावेळी तक्रारदार यांना चाकूचा धाक दाखवून ट्रकमधून खाली उतरवून माल-ासह ट्रक जबरी चोरी करून घेवून गेलेबाबत तक्रारदार यांनी कापूरबावडी पोलीस स्टेशन जि. ठाणे येथे तक्रार दिली होती. सदर गुन्हयाची सुरुवात खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतून झाल्यामुळे वरिष्ठांच्या आदेशाने सदर गुन्हा पुढील तपासकामी खांदेश्वर पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आला होता. त्याअन्वये खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गु.र.क. १४२/२०२२ भादवि कलम ३९२, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. पोलीस उप आयुक्त, परि २ पनवेल शिवराज पाटील, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भागवत सोनवणे यांनी वेळोवेळी पोलीस ठाणेत भेटी देवून सदर गंभीर गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते.

नमुद गुन्हयात चोरीस गेलेला ३ लाख रूपयांचा आयशर ट्रक क्र. GJ-15-XX-1216 व ४,६२,७५९/- रूपयांचा ट्रकमधील मालाचा शोध घेत असताना खांदेश्वर पोलीसांनी कळंबोली एक्सप्रेस वे पासून ते साकेत ब्रीज ठाणे दरम्यानच्या रोडवरील सीसीटिव्ही फुटेजची तपासणी केली परंतु त्यामध्ये फिर्यादींचा ट्रक जाताना दिसून आला नाही. त्यामुळे फिर्यादींवर शंका निर्माण झाल्याने पोलीसांनी फिर्यादीकडे केलेल्या कैशल्यपुर्वक तपासात व तांत्रिक तपासाच्या आधारे सदरचा गुन्हा तक्रार देणारे ट्रक चालक यांनी केला असल्याचे व गुन्हा घडल्याचा बनाव करून खोटी तक्रार दिल्याचे निष्पन्न करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात चोरीस गे-लेला ३,००,०००/- रूपये किंमतीचा आयशर ट्रक क्र. GJ-15-XX-1216 व ८०, ९२०/- रूपये किंमतीच्या कन्ट्रक्शनसाठी लागणाऱ्या लोखंडी पाईप असा एकूण ३,८०,९२०/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला असून गुन्हयातील माल हा फिर्यादींनीच विक्री केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात भा.द.वि. कलम ४०७ वाढ करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा अधिक तपास स.पो.नि. समीर चासकर करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त, परि २ पनवेल शिवराज पाटील, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भागवत सोनवणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे, यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. समीर चासकर, पो.ना. भाऊराव बाचकर, पो. ना. चेतन घोरपडे, पो.ना. अमित पाटील यांनी केलेली आहे.




# शासन व लोकप्रतिनिधींनी एकत्रित आल्याशिवाय तालुक्याचा विकास साधता येणार नाही : आ.महेंद्र थोरवे



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका समन्वय समितीची आढावा बैठक आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली काल दि.३१ मे रोजी संपन्न झाली.शासन व लोकप्रतिनिधींनी एकत्रित आल्याशिवाय तालुक्याचा विकास साधता येणार नाही असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी यावेळी प्रसंगी केले.

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत तालुक्यातील प्रत्येक विभागाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. व कर्जत तालुक्यातील प्रत्येक विभागातील कामाची सद्यस्थिती काय ? हे आमदार महेंद्र थोरवे यांनी जाणून घेतले. बैठकीस तहसीलदार विक्रम देशमुख, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, इतर खात्याचे प्रशासकीय अधिकारी व समन्वय समितीचे सदस्य उपस्थित होते.

कोविड कालावधीमध्ये जवळपास पंधराशे कुपोषित बालकांना पोषण आहाराचे कीट देण्यात आले, असे सांगण्यात आले, केंद्र व राज्य सरकार व इतर विभागाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करावे व यासोबत योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना आमदार महेंद्र थोरवे यांनी दिल्या.या निमित्ताने कोविड कालावधीत ज्या सामाजिक संस्थांनी मदत केली, त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले, नसरापूर चिंचवली सालवड या भागात सुद्धा एसटी सेवा चालू करण्यात यावी अशी सूचना आगार व्यवस्थापकांना देण्यात आली, खरीप हंगामाकरिता त्वरित उपयुक्त खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावी. असे आदेश कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले.

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत ज्या कामांना कार्यारंभ आदेश दिले आहेत. परंतु कामे चालू झाली नसल्याने ती कामे त्वरित चालू करण्याचे आदेश देण्यात आले, वाढीव बिलांच्या संदर्भात अनेक लोकांच्या तक्रारी आहेत, याच्याकडे आपण गांभीर्याने लक्ष द्यावे अशा सूचना उपअभियंता यांना देण्यात आल्या, वनहक्क दाव्यासंदर्भात जी प्रकरणे प्रलंबित आहेत, ती त्वरीत मार्गी लावावीत,घरकुल योजनेसंदर्भात जो खरा लाभार्थी आहे, त्याला योजनेचा लाभ शक्यतो मिळत नाही. त्याचे सर्वेक्षण करण्यात यावे.

शेवटी कोविड कालावधीत आमदार महेंद्र थोरवे यांनी मोठ्या प्रमाणात निधी आणल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव यावेळी मांडण्यात आला.कोविड कालावधीत जवळपास तीनशे अकरा मृत व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजाराचे त्यांच्या कुटुंबीयांना मानधन देण्यात आले. कुटुंबात ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, त्याच्या पत्नीस प्रत्येकी हजार रुपये प्रति महिना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पेन्शन चालू करण्यात आली आहे. अशी माहिती तहसीलदार विक्रम देशमुख यांनी दिली.